# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 05.05.2024** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

- **लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात प्रचार शिगेला. प्रचारसभा, पथफेऱ्यांवर राजकीय पक्षांकडून भर.**
- **जम्मू काश्मीर मध्ये वायुदलाच्या ताफ्यावरील दहशतवाद्यांच्या हल्यात वायुदलाच्या एका सैनिकाचा मृत्यू.**
- **लोकसभा निवडणुकीच्या प्रक्रियेचं निरीक्षण करण्यासाठी २३ देशांमधील ७५ आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी भारतात दाखल.**
- **भारताच्या अर्थव्यवस्थेत भयगंडाचा अडसर येत असल्याचं ज्यो बायडन यांचं वक्तव्य भारतानं फेटाळलं. भारत कायमच स्वागतशील असल्याचं परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांचं स्पष्टीकरण.**

**आणि**

- **ईशान्य भारतात आज आणि उद्या मुसळधार पावसाची शक्यता तर वायव्य आणि मध्य भारतातील अनेक भागांत कमाल तापमानात वाढ होण्याचा अंदाज.**

**लोकसभा प्रचार**

लोकसभा निवडणुकीसाठी प्रचाराला आजचा एकच दिवस शिल्लक असल्यामुळे राजकीय पक्षांकडून मतदारांपर्यंत पोचण्याची पराकाष्ठा केली जात आहे. प्रचारसभा आणि पथफेऱ्यांवर राजकीय पक्षांकडून भर दिला जात आहे. या टप्प्यात दहा राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशासह ९३ मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. केंद्रीय गृहमंत्री आणि भारतीय जनता पार्टीचे वरिष्ठ नेते अमित शहा यांनी गुजरातमध्ये प्रचारसभेत बोलताना आरक्षण हा अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांचा घटनात्मक हक्क असल्याचं सांगितलं आणि भाजपा सत्तेत असेपर्यंत ते कायम राहील असं स्पष्ट केलं. शहा यांनी छोटा उदेपूर आणि वन्सडा इथं सभा घेतल्या. कॉंग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी यांनी नवी दिल्लीत एका सभेत बोलताना इंडी आघाडी सत्तेवर आल्यास अग्निवीर योजना बंद केली जाईल असं सांगितलं. या योजनेमुळे लष्कराचं मनोधैर्य कमी झाल्याचा दावा त्यांनी केला.

आम आदमी पार्टीचे वरिष्ठ नेते आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी भरुच इथल्या सभेत बोलताना ध्रुवीकरण, वाढती महागाई आणि बेरोजगारी यांना सत्तारुढ भाजपा जबाबदार

असल्याचा आरोप केला. कॉंग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी कर्नाटकातील दावणगेरे मतदारसंघातल्या प्रचारसभेत बोलताना केंद्र सरकारनं फक्त अब्जाधीशांच्या फायद्यासाठी काम केलं असा अरोप केला. उद्योगपतींचं सोळा लाख कोटी रुपयांचं कर्ज माफ करण्यात आलं, पण शेतकऱ्यांचं कर्ज माफ करण्यात आलं नाही, असा आरोप त्यांनी केला. बहुजन समाज पक्षाच्या अध्यक्ष मायावती यांनी आग्रा इथं झालेल्या सभेत वाढती महागाई आणि बेरोजगारीमुळे लोक त्रस्त झाल्याचा आरोप केला. दरम्यान, पंतप्रधान आणि भाजपाचे वरिष्ठ नेते नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेशात इटावा आणि धौराहरा मतदारसंघांमध्ये सभा घेणार आहेत, तसंच अयोध्येत आज संध्याकाळी पथफेरीतही ते सहभागी होणार आहेत. तत्पूर्वी ते रामलल्लांचं दर्शन घेणार आहेत. मोदी यांचं आज रात्री ओडिशात आगमन होणार आहे. त्यांच्या उद्या बेहरामपूर आणि नवरंगपूर मतदारसंघांमध्ये सभा होणार आहेत.

**चौथा टप्पा**

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात २९८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असतील. या टप्प्यात नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड या  मतदारसंघांमध्ये निवडणूक होणार आहे. या मतदारसंघांमध्ये एकंदर दोन कोटी २८ लाख मतदार त्यांचा कौल देणार आहेत. तिथं येत्या तेरा तारखेला मतदान होणार असून, चार जूनला मतमोजणी होणार आहे. पाचव्या टप्प्यातील मतदान 20 मेला होणार आहे. यासाठी राज्यातील 13 लोकसभा मतदारसंघात 397 उमेदवारांचे 512 अर्ज दाखल झाले होते. या अर्जांची छाननी केल्यानंतर 301 उमेदवारांचे अर्ज वैध ठरले असल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

**आंतरराष्ट्रीय**

लोकसभा निवडणुकीच्या प्रक्रियेचं निरीक्षण करण्यासाठी २३ देशांमधील ७५ आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी भारतात दाखल झाले आहेत. निवडणुकीची प्रक्रिया उत्तम प्रकारे पार पाडण्याबाबतची कटिबद्धता अधोरेखित करण्यासाठी निवडणूक आयोगानं या प्रतिनिधींना निमंत्रित केलं आहे. भारतभेटीदरम्यान सहा दिवसांच्या निरीक्षण कार्यक्रमात हे प्रतिनिधी सहभागी होतील. मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार, तसंच आयुक्त ज्ञानेशकुमार आणि डॉक्टर सुखबीरसिंग संधू उद्या त्यांच्याशी संवाद साधतील. त्यानंतर हे प्रतिनिधी महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश या सहा राज्यांमधल्या विविध मतदारसंघांमध्ये मतदान आणि इतर गोष्टींची पूर्वतयारी यांचं निरीक्षण करतील, असं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे.

**सीतारामन**

विकसित भारताच्या पायाभरणीत उच्चशिक्षणाचं अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन केंद्र सरकारनं नवीन शैक्षणिक धोरणाला प्राधान्य दिलं असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन

यांनी काल सांगितलं. महाराष्ट्रात पुण्यातील डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठानं आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

गेल्या तीन चार दशकांमध्ये तत्कालीन केंद्र सरकारनं उच्च शिक्षणासाठी भरीव तरतूद केली नव्हती. मात्र २०१४ पासून केंद्र सरकारनं उच्च शिक्षणाच्या पायाभरणीसाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले असं सीतारामन यांनी स्पष्ट केलं. आयआयटी तसंच अखिल भारतीय वैद्यकीय विज्ञान संस्था यांनी व्यवसायाभिमुख उच्चशिक्षण संस्था उभारण्यात मोलाचं योगदान दिलं असं त्यांनी सांगितलं. नवीन शैक्षणिक धोरणामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात क्रांतीकारक बदल होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यापीठाचे कुलगुरू प्रमोद पांडे आणि उपकुलगुरू प्रसाद जोशी या प्रसंगी उपस्थित होते.

कांदा-निर्यातबंदी

केंद्र सरकारनं कांद्यावरची निर्यातबंदी उठवली आहे. परकीय व्यापार महासंचालनालयानं याबाबत काल अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. ही निर्यातबंदी तात्काळ अंमलात येईल, असं त्यात नमूद करण्यात आलं आहे. किमान निर्यात मूल्य प्रति मेट्रिक टन ५५० डॉलर आवश्यक असल्याचं त्यात स्पष्ट करण्यात आलं आहे. २०२४च्या रब्बी हंगामातील उत्पादनाचा अंदाज, खरीप चांगला जाण्याचे संकेत, बाजारपेठेतील सध्याची स्थिती, आंतरराष्ट्रीय उपलब्धता आणि किंमतींबाबतची सद्यस्थिती लक्षात घेऊन ही निर्यातबंदी उठवण्यात आली आहे.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण विविधभारतीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**
**या बातम्या आपण न्यूज ऑन एआयआर या ॲपवरही ऐकू शकता.**

**दहशतवाद हल्ला**

जम्मू काश्मीरच्या पुंछ जिल्ह्यात काल दहशतवाद्यांच्या गटानं वायुदलाच्या ताफ्यावर केलेल्या हल्यात वायुदलाच्या एका एअरमनला वीरगती प्राप्त झाली. या हल्यात पाच सैनिक जखमी झाले, असून त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर आहे. हा हल्ला शाह सत्तार वनक्षेत्रात झाला. सशस्त्र दलांवर झालेल्या हल्ल्यापैकी या वर्षातला हा सर्वात मोठा दहशतवादी हल्ला आहे. हल्ल्यानंतर जखमी सैनिकांना पूंछ मधून उधमपूर मधल्या कमांड रुग्णालयात नेण्यात आलं. गुन्हेगारांना पकडण्यासाठी स्थानिक राष्ट्रीय रायफल्स युनिटने घेराव घातला असून शोध मोहीम सुरू केली आहे. अनंतनाग-राजौरी लोकसभा मतदारसंघाचा एक भाग असलेल्या पूंछ मध्ये 25 मे रोजी सहाव्या टप्प्यात मतदान होणार आहे.

**जयशंकर-बायडन**

भारताच्या अर्थव्यवस्थेत भयगंडाचा अडसर येत असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडन यांचं वक्तव्य भारताचे परराष्ट्रमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी फेटाळून लावलं आहे. एका माध्यम संस्थेनं काल आयोजित केलेल्या परिषदेत जयशंकर यांनी, भारत कायमच स्वागतशील

राहिला असल्याचं स्पष्ट केलं. जगाच्या इतिहासात भारत कायमच एकमेवाद्वितीय राहिला आहे आणि त्यानं विविध समाजांमधल्या नागरिकांचं कायम स्वागतच केलं आहे, असं ते म्हणाले.
भारत आणि जपान स्थलांतरितांचं स्वागत करण्यास फारसे उत्सुक नसतात, त्यामुळे त्यांच्या अर्थव्यवस्थेत अडथळा येत आहे, असं वक्तव्य बायडन यांनी केलं होतं. त्यावर जयशंकर यांनी भाष्य केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळात भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये मोठ्या सुधारणांबाबत तयारी केली जात आहे, असं त्यांनी नमूद केलं. भारताचं परराष्ट्र धोरण स्पष्ट असल्यामुळे भारत विविध जागतिक मुद्द्यांबाबत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**नीट**

राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या म्हणजे एनटीएच्या वतीनं आज होत असलेल्या पदवीपूर्व वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेची तयारी पूर्ण झाली आहे. देशातल्या ५५७ शहरांमध्ये आणि देशाबाहेरील 14 शहरांमधील विविध केंद्रांवर ही परीक्षा होणार असून, या वर्षी 24 लाखांहून अधिक उमेदवार ही परीक्षा देत आहेत.भारतीय प्रमाणवेळेनुसार परीक्षा दुपारी २ ते ५.२० या वेळेत होईल.

**हवामान**

ईशान्य भारतात आज आणि उद्या वादळ आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. पुढील पाच दिवसांत अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, सिक्कीम, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे तर वायव्य आणि मध्य भारतातील अनेक भागांमध्ये कमाल तापमानात दोन ते चार अंश सेल्सिअस वाढ होण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. देशाच्या उर्वरित भागात कमाल तापमानात कोणताही लक्षणीय बदल होण्याची शक्यता नसल्याचं आयएमडीनं म्हटलं आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**